# कोर्ट विद्यमान एम आर चव्हान, तहसिलदार, वर्धा यांचे कार्यालय

क्र. अका जमिन/तह.वर्धा/कावि- 624 /2017

कार्यालय तहसिलदार, वर्धा

दिनांक :- 17 जुलै, 2017

**<u>जा ही र ना मा</u>**

या जाहीरनामाव्दारे सर्व सबधीत लोकांना सुचित करण्यात येते की, तिरुपती अर्बन को. ऑप. बँक लि. शाखा वर्धा यांचा तक्रार अर्ज दिनांक 01.12.2016 अन्वये 1) श्री सतिश विलास नरहरशेट्टीवार व (2) श्रीमती कविता सतिश नरहरशेट्टीवार रा. गजानन प्रसाद, गजानन नगरी हिरोहोडा शोरुम नागपूर रोड वर्धा यांनी बँकेतून गहाण मुदती कर्ज घेवून फसवणूक केल्या प्रकरणी तक्रार दाखल केलेली आहेत.

मौजा इंझापूर येथील **पुर्नमोजणीचे रेकॉर्ड नुसार** सर्व्हे नंबर 22 क्षेत्र 18.10 हे आर (1) शंकर राघोबा वैद्य (2) शामराव जागोबा वैद्य (3) हेमराज नारायण वैद्य (4) श्रीधर वैद्य यांचे नावाने सन 1985-86 पूर्वी होता. नंतर स. न. 22 पैकी 6.00 हे आर शंकर राघोबा वैद्य यांचे नावाने दर्शविलेला आहे. व उर्वरीत क्षेत्र 12.44 आर श्रीरामकुमार होरा अँन्ड कंपनी तर्फे भागीदार रामकुमार रामकृष्ण होरा यांचे नावाने दर्शविलेला आहे. **एकत्रीकरणाचे रेकॉर्डनुसार** सर्व्हे क्रमांक 22 ला सर्व्हे क्रमांक 20 क्षेत्र 18.10 (1) शंकर डोमा वैद्य (2) शामराव जागोबा वैद्य (3) हेमराज नारायण वैद्य (4) श्रीधर श्रावण वैद्य यांचे नावाने दर्शविलेला आहे व त्यानंतर रामकुमार होरा ॲन्ड कंपनी यांचे नावाने 12.44 हे आर दिनांक 19.09.1988 मध्ये दर्शविलेला आहे. रामकुमार होरा यांनी सर्व्हे नंबर 20/1/क पैकी क्षेत्र 6.81 हे आर दिनांक 28.07.2008 ला दत्ता राघोबा मेघे यांना विक्री केलेली आहे. तसेच 20/2/अ क्षेत्र 0.98 हे आर दत्ता राघोबा मेघे यांना विकलेला आहे. दत्ता मेघे यांनी 6.81 हे आर वृंदा समीर मेघे यांना 18.10.2010 ला बक्षीसपत्र करुन दिले तसेच 20/2 अ 0.98 हे आर शालीनी दत्ता मेघे यांना बक्षीसपत्र करुन दिले.

सन 1984-85 नुसार सर्व्हे क्रमांक 22 पैकी अकृषक परवानगी खालील प्रमाणे दर्शविली आहे.

| अ. क्र. | आदेश क्रमांक | दिनांक | क्षेत्र | प्लॉटस | खातेदाराचे नांव (मुळ मालक) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | NAP 34/17/1984-85 | 05.03.1985 | 0.98 HR | प्लॉटस 1 ते 37 | शंकर राघोबा वैद्य व इतर 3 |
| 2 | NAP 34/20/1984-85 | 12.03.1985 | 2.32 HR | प्लॉटस 1 ते 131 | वरील प्रमाणे |
| 3 | NAP 34/29/1984-85 | 07.04.1985 | 2.17 HR | प्लॉटस 1 ते 115 | वरील प्रमाणे |
| 4 | NAP 34/32/1984-85 | 13.04.1985 | 2.32 HR | प्लॉटस 1 ते 113 | वरील प्रमाणे |

फेरफार क्रमांक 1446 दिनांक 28.04.2011 सर्व्हे नंबर 22 पैकी 0.98 हे आर अकृषक नोंद आहे. सदर सव्हेर नंबर 20/2/अ शालिनी दत्ता मेघे यांचे नावाने अस्तीत्वात होता. फेरफार क्रमांक 1463 दिनाक 01.07.2011 सर्व्हे नंबर 22 पैकी 2.32 हे आर अकृषक नोंद आहे, फेरफार क्रमांक 1464 दिनाक 01.07.2011 सर्व्हे नंबर 22 पैकी 2.17 हे आर अकुषक नोंद आहे, तसेच फेरफार क्रमांक 1447 दिनाक 28.04.2011 सर्व्हे नंबर 22 पैकी 2.32 हे आर अकृषक नोंद आहे. सदर सर्व्हे नंबर 20/1 क्षेत्र 6.81 हे आर वृंदा समीर मेघे यांचे नावाने अस्तीत्वात होता.

वरील सर्व्हे 20/1 क्षेत्र 6.81 पैकी 2.17 व 2.32 हे आर कविता सतिश नरहरशेटटीवार यांचे नावाने दिनांक 08.10.2012 ला विक्री करुन दिली तसेच 2.32 हे आर सतिश विलास नरहरीशेट्टीवार यांचे नावाने विक्री करुन दिली व सर्व्हे नंबर 20/2/अ क्षेत्र 0.98 हे आर शालीनी दत्ताजी

उपअधिक्षक, भुमी अभिलेख वर्धा यांचे अहवालानुसार मौजा इंझापूर येथील सर्व्हे क्रमांक 20/2/अ , 20/1/अ/1/ब, 20/1/अ/1/अ, 20/1/अ/1/क या सर्व्हे क्रमांकास सदर कार्यालयाने अकृषक करणे संदर्भात कोणतीही शिफारस केलेली नसल्याचे आपले अहवालात नमुद केले आहे.

नगर रचनाकार, वर्धा यांचा दिनांक 09.05.2017 अन्वये अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवाला नुसार मौजा इंझापूर येथील सर्व्हे क्रमांक (1) 20/2/अ आराजी 0.98 हे आर (2) सर्व्हे क्रमांक 20/1/अ/1/ब आराजी 2.32 हे आर (3) सर्व्हे क्रमांक 20/1/अ/1/अ आराजी 2.17 हे आर व (4) सर्व्हे क्रमांक 20/1/अ/1/क आराजी 2.32 हे आर जमीनीवर अकृषक लेआऊट मंजूर करण्यासाठी शिफारस करण्यात आलेली नाही असे त्यांचे अहवालात नमुद आहे.

उक्त शेत सर्व्हे क्रमांकाचा अकृषक आदेशानुसार घेण्यात आलेला फेरफार त्यानुसार झालेली नोंद अयोग्य असल्याचे दिसते. त्यामुळे सदर सर्व्हे नंबर पूर्ववत कृषक होणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर अकृषक आदेश रद्द करुन उक्त सर्व्हे नंबर कृषक करण्या करीता पुनर्विलोकन करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

| अ. क्र. | आदेश क्रमांक | दिनांक | क्षेत्र | सर्व्हे क्रमांक | खातेदाराचे नांव (मुळ मालक) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | NAP 34/17/1984-85 | 05.03.1985 | 0.98 HR | 20/2/अ | शंकर राघोबा वैद्य व इतर 3 |
| 2 | NAP 34/20/1984-85 | 12.03.1985 | 2.32 HR | 20/1/अ/1/ब | वरील प्रमाणे |
| 3 | NAP 34/29/1984-85 | 07.04.1985 | 2.17 HR | 20/1/अ/1/अ | वरील प्रमाणे |
| 4 | NAP 34/32/1984-85 | 13.04.1985 | 2.32 HR | 20/1/अ/1/क | वरील प्रमाणे |

उपरोक्त प्रकरणी ज्या कुणाचे आक्षेप/हरकती असतील त्यांनी जाहीरनामा काढलेल्या दिनांकापासुन 15 दिवसाचे आत आपले आक्षेप/हरकती कार्यालयीन दिवसी व वेळेत स्वत: किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत लेखी सादर करावे. उक्त तारखेनंतर येणारे आक्षेप/हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

तहसिलदार, वर्धा

प्रतिलिपी :- 1) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, ( NIC ) वर्धा यांना माहिती तथा उचीत कार्यवाही करीता सदर जाहीरनामा कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा.

2) ग्रामपंचायत, मौजा इंझापूर यांनी जाहीरनामा ग्रामपंचायत कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावून व गावात मुनादी देवून जाहीरनामा प्रसिध्दी करुन अहवाल त्वरीत सादर करावा..

2) तलाठी इंझापूर यांनी जाहीरनामा कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावून व गावात मुनादी देवून जाहीरनामा प्रसिध्दी करुन अहवाल त्वरीत सादर करावा.

3) जमादारमाल, तहसिल कार्यालय वर्धा यांनी जाहीरनामाची प्रत तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावुन प्रसिध्दी करावी व प्रसिध्दी अहवाल तात्काळ सादर करावा.

तहसिलदार, वर्धा

कार्यालय तहसिलदार वर्धा